मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
। पश्चिम महाराष्ट्र ।
www.rajdand.com
follow us : /rajdandlive
सातारा दि. २५ मे २०२४
RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २५५ ✻ सातारा ✻ मंगळवार ✻ दि. २८ मे २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# 'अब की बार...४०० पार' घोषणेचा निवडणुकीत फटका बसला

## भुजबळांनी जाहीरपणे दिली कबुली

**मुंबई :** यंदाची लोकसभा निवडणूक विविध मुद्द्यांनी गाजली. या निवडणुकीत भाजपकडून देण्यात आलेल्या 'अब की बार, चारसो पार' या घोषणेचीही मोठी चर्चा झाली. मात्र देशात सत्तेत येण्यासाठी २७२ जागांचीच गरज असताना भाजप ४०० पारचा नारा देत आहे, कारण त्यांना संविधान बदलायचं आहे, असा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला.

हा मुद्दा समोर येताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा वर्ग सत्ताधाऱ्यांवर नाराज झाल्याची चर्चा रंगत होती. अशातच आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीच्या मेळाव्यात बोलताना राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळयांनीही



'अब की बार, चारसो पार' या घोषणेचा निवडणुकीत आपल्याला फटका बसल्याची कबुली दिली आहे. पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, मला आपल्याला सांगायचंय की, आधीच चारशे पार...चारशे पार ही घोषणा देण्यात आली आणि संविधान बदलणार हे दलित समाजाच्या मनावर इतके बिंबले की ते काढता काढता नाकी नऊ आले. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदीहे एका टीव्ही मुलाखतीत १५ ते २० मिनिटं हेच सांगत होते की आम्ही संविधान बदलणार नाही, उलट संविधान दिन साजरा करणार आहोत. मात्र या सगळ्याचा परिणाम आपल्याला आताच्या निवडणुकीत जाणवला. हे संपत नाही तोच आता मनुस्मृतीचा विषय समोर आला आहे.

शाळांमध्ये मनुस्मृतीतील काही गोष्टी अभ्यासक्रमात येणार, अशी चर्चा सुरू आहे. मनुस्मृती म्हटलं की झालं मग कल्याण! वर्णव्यवस्था मान्य नाही म्हणून आम्ही मनुस्मृती जाळली आहे. असं असताना आता पुन्हा कोणीतरी हे विषय वर काढत आहे, अशा शब्दांत भुजबळ यांनी सरकारला घरचा आहेर दिला.

दरम्यान, आतापर्यंत विरोधकांकडून 'अब की बार चारसो पार' या भाजपच्या घोषणेचा समाचार घेतला जात असताना आता महायुतीत असणाऱ्या छगन भुजबळ यांनीही या घोषणेमुळे निवडणुकीत फटका बसल्याचं मान्य केल्याने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भुजबळांकडून जागा वाटपावरही भाष्य विधानसभा निवडणुकीवेळी लोकसभेसारखी खटपट होता कामा नयेत, आपल्या हक्काचा वाटा आपल्याला मिळाला पाहिजे. आपल्या पक्षाला विधानसभा निवडणुकीत ८० ते ९० जागा मिळाल्या पाहिजेत, अशी मागणी यावेळी छगन भुजबळ यांनी केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसची राज्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठक

**मुंबई :** निवडणूक ही कार्यकर्त्यांची परीक्षा असून निवडणुकीच्या विजयाचा कोणीही उन्माद करू नये आणि पराभवाने खचूनही जाऊ नये. कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो त्याला जपले गेले पाहिजे असे सांगतानाच आता विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी पक्षाच्या बैठकीत आज केले.

राष्ट्रवादी काँग्रेसची राज्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठक गरवारे क्लब हाऊस येथे मोठ्या उत्साहात पार पडली.

अजितदादा पवार यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे यावेळी मनोधैर्य वाढवले. येत्या विधानसभा निवडणुकीला आपण सामोरे जाणार असून त्यानुसार पक्ष संघटनेची बांधणी करायची असल्याचेही अजितदादा पवार यांनी सांगितले.

येत्या १० जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २५ वा वर्धापनदिन असून यानिमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात विविध कार्यक्रम राबवविले जातील, असेही अजितदादा पवार यांनी सांगितले. अल्पसंख्याक समाजासाठी सर्वाधिक चांगले निर्णय हे महायुती सरकारच्या काळात घेतले आहेत. शिव - फुले - शाहू - आंबेडकरांची विचारधारा ही आपल्या पक्षाचा मूळ गाभा असून कितीही मोठी किंमत मोजावी लागली तरी आम्ही ही विचारधारा सोडणार नाही, अशी भूमिका अजितदादा पवार यांनी स्पष्ट केली.

येणारी विधानसभा निवडणूक आपणा सर्वांसाठी महत्त्वाची असून त्यावर आपण सर्वांनी लक्ष केंद्रीत केले पाहिजे असे आवाहन राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय दर्जा आपल्याला परत मिळवायचा आहे आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा विस्तार देशभरात करायचा असल्याचा निर्धार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला.

अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली जो आम्ही सर्वांनी अभूतपूर्व निर्णय घेतला. त्यावर महाराष्ट्राची जनता १०० टक्के शिक्कामोर्तब करेल असा विश्वास प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महाराष्ट्रात वैचारिक पातळी खालावलेली दिसली. मात्र, प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी किंवा कार्यकर्त्यांनी कोणाविषयी टीकाटिप्पणी करताना मर्यादा ओलांडली नाही, याचा सुनिल तटकरे यांनी आवर्जून उल्लेख करतानाच स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे आपणच खरे वारसदार आहोत याचा अभिमान असल्याचे सुनिल तटकरे म्हणाले.

येत्या विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जायचे आहे त्यादृष्टीने आपल्याला आता संघटनात्मक बांधणी करायची आहे. 'एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र' ही भूमिका घेऊन आजपासून सर्वांनी कामाला लागावे, असे आवाहन करतानाच आपल्याला अपेक्षित असलेले यश निश्चितपणे मिळेल असा विश्वास सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला.

पावसाळी अधिवेशनापूर्वी जिल्हास्तरावर विभागीय मेळावे घेणार असल्याचे सांगतानाच दिनांक १० जून रोजी पक्षाचा २५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करणार असल्याचे सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागून त्यादृष्टीने पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्यावर भर द्यावा आणि सर्वांनी विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करावे असे आवाहन पक्षाचे ज्येष्ठ नेते व अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक आज मुंबईतील गरवारे हॉल येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ आदी उपस्थित होते.

## पदवीधर,शिक्षक निवडणूक मतदार नोंदणीसाठी २८ मे अंतीम मुदत

**मुंबई :** विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर,कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून, या कार्यक्रमानुसार मतदार नोंदणीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ही दिनांक २८ मे २०२४ असून हे अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन स्विकारले जातील अशी उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या जाहीर केलेल्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नामनिर्देशपत्रे शुक्रवार दिनांक ३१ मे, २०२४ स्विकारली जातील. ही नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी शुक्रवार दिनांक ७ जून, २०२४ ही अंतिम मुदत राहील. बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल.

विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर,कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रमासाठी दि. २४ मे २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी संबंधित मतदार यादीत नाव नोंदणीसाठी भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे दि. २८ मे, २०२४ पर्यंत https://gterollregistration. mahait.ीस या संकेतस्थळावर ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्विकारले जातील. विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर,कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी जास्तीत जास्त पदवीधर नागरिकांनी विहित मुदतीत मतदार नोंदणी करावी असे आवाहन उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी केले आहे.

## मुंबई तुंबु नये म्हणून सुरू केलेल्या ब्रीमस्टोवेड प्रकल्पाचा आढावा घेणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई :** मुंबई तुंबू नये म्हणून २००५ साली मुंबई मनपा ने कोट्यावधी रूपये खर्चून सुरू केलेल्या महत्वपूर्ण ब्रिमस्टोवेड प्रकल्पाच्या कामाचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला पाहिजे.आपण याबाबत लवकरच मुंबई मनपा आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन ब्रिमस्टोवेड प्रकल्पाचा आढावा घेणार आहोत.तसेच मिठीनदीसह

मुंबईतील सर्व नाले सफाईची कामे येत्या ३१ मे पर्यंत पूर्ण करावीत अशी सूचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवलेंनी संबंधित मनपा अधिकाऱ्यांना केली.



ना.रामदास आठवलेंनी आज बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील मिठी नदी सफाई कामाची पाहणी केली.यावेळी रिपाइं चे जिल्हा अध्यक्ष साधू कटके ;मनपा चे कार्यकारी अभियंता विठ्ठल जाधव आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

मिठी नदी सफाई चे कॉन्ट्रॅक्ट ४२ कोटी रुपयांचे देण्यात आले आहे.मिठी नदीचे पात्र १८० मीटर रुंद आहे.मिठी नदीतून गाळ कचरा उपसण्याचे काम वेगाने सुरू आहे. मिठी नदी सफाई काम ९० टक्के पूर्ण झाले असून येत्या दि .३१ मे पर्यंत मिठी नदीचे सफाई काम पूर्ण होईल अशी माहिती संबंधित ठेकेदाराने यावेळी दिली.

२६ जुलै २००५ रोजी मुंबईत महापूर आलेला होता. त्यात मुंबईत मोठी मनुष्यहानी झाली होती.

मुंबईत जलप्रलय येण्यास येथील मिठी नदी आणि तुंबलेले नाले आणि प्लास्टिक कचरा ही कारणे पुढे आली.या संकटातून मुंबई मनपा ने धडा शिकून भविष्यात मुंबईत जलप्रलय होऊ नये मुंबई तुंबु नये म्हणून महत्वाकांक्षी ब्रिमस्टोवेड प्रकल्प मुंबईत सुरू करण्यात आला.या प्रकल्पाचे काम किती पूर्ण झाले याबाबत ची सर्व माहिती घेण्यासाठी आपण लवकरच मनपा आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले.

# चक्रीवादळाच्या तडाख्याने पश्चिम बंगालमध्ये वाताहात

## झाडं कोसळली, रेल्वे गाड्याही रद्द, एकाचा मृत्यू



**मुंबई :** पश्चिम बंगाल आणि बांगलादेशच्या किनारपट्टी भागात रविवारी रात्री दाखल झालेल्या रेमल चक्रीवादळामुळे पश्चिम बंगालमध्ये जनजीवन विस्कळीत झालं आहे. या वादळामुळे सर्वत्र झाडे कोसळली असून रस्त्यांवर पाणी साचलं आहे. तसेच पश्चिम बंगालमधील वाहतूक सेवाही विस्कळीत झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे या वादळामुळे एकाचा मृत्यू झाल्याचेही पुढे आलं आहे.

रविवारी वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे पश्चिम बंगालमध्ये जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. या पावसामुळे अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळले, तर काही ठिकाणी झाडेही उन्मळून पडली. रविवारी रात्री कोलकाता शहरात १४० मिमी. पाऊस झाल्याचं हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

**वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत**

रविवारी झालेल्या पावसामुळे राज्यातील अनेक भागात वाहतूक सेवाही विस्कळीत असून काही रेल्वे गाड्या करण्यात आल्या आहेत. तसेच मेट्रो सेवाही स्थगित करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना अडचणीचा सामना करावा लागतो आहे. खराब हवामानाचा फटका हवाई वाहतूक व्यवस्थेलाही बसला आहे. या वादळामुळे कोलकाता विमानतळावरील काही उड्डाणे रविवारी दुपारपासूनच स्थगित करण्यात आली होती. मात्र, दिलासादायक बाब म्हणजे आज सकाळी ९ वाजतापासून विमान सेवा पुन्हा सुरु करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

**भिंत कोसळल्याने एकाचा मृत्यू :**

मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे कोलकात्यात भिंत कोसळल्याची घटना घडली. या घटनेत एका ५६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याचं पुढं आलं आहे. मोहम्मद साजिब असं या व्यक्तीचं नाव आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील एंटाली भागातील बिबीर बागान येथे ही घटना घडली.

**हवामान विभागाकडून अलर्ट जारी**

दरम्यान, सोमवारी सायंकाळपर्यंत या चक्रीवादळाची तीव्रता कमी होईल, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. याशिवाय हवामान विभागाकडून राज्यातील मुर्शिदाबाद आणि नादिया या दोन जिल्ह्यांमध्ये रेड अलर्टही जारी करण्यात आला आहे. या दोन जिल्ह्यांमध्ये सोमवारी ७ ते २० सेंटीमीटर पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. कोलकात्यासह आठ जिल्ह्यांमध्ये ३० ते ६० किमी प्रतितास वेगाने गडगडाट आणि वादळी वारे वाहण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

# पोर्शे कार अपघातात आधी मुलगा, मग वडील अन् आता आजोबांनाही अटक

**पुणे :** पुणे पोर्शे कार अपघातातील आरोपी १७ वर्षीय मुलाच्या वडिलांवर खोटारडे करणे, गुन्हेगारी कट रचणे आणि पुरावे नष्ट करणे या अतिरिक्त आरोपांचा सामना करावा लागत आहे. अत्यंत मद्यधुंद असताना किशोरने त्याच्या वडिलांची २.५ कोटींची पोर्शे इलेक्ट्रिक स्पोर्ट्स कार चालवताना दोन लोकांचा बळी घेतला होता. शहरातील रिअल इस्टेट व्यावसायिक असलेल्या मुलाच्या वडिलांना (झींपश झेश्रळलश) पोलिसांपासून पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना अटक करण्यात आली. 'ज्युवेनाइल जस्टिस ऍक्ट' अंतर्गत आपल्या मुलाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप वडिलांवर आधीच आहे.

फसवणुकीच्या आरोपाखाली वडील सध्या ७ जूनपर्यंत तुरुंगात आहेत. महागड्या, उच्च-कार्यक्षमता कारसाठी १,७५८ नोंदणी शुल्क भरण्यात तो अयशस्वी ठरला आहे. त्यांना जिल्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. गुन्हे शाखेने इतर आरोपांवरील सर्व संबंधित प्रकरणे ताब्यात घेतली आहेत. मुलाच्या आजोबांनाही अटक करण्यात आली असून, ते आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. कौटुंबिक कर्मचाऱ्याला चुकीच्या पद्धतीने बंदिस्त केल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

या भीषण घटनेची जबाबदारी घेण्यासाठी पोर्शचा ड्रायव्हर ज्याला धमकी देऊन रोख रक्कम आणि भेटवस्तू देऊन लाच दिल्याचा आरोप आहे. १२ वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी तो किशोर आणि त्याच्या दोन मित्रांना दारू प्यायलेल्या ठिकाणी घेऊन गेला होता, असे त्याला सांगण्यास भाग पाडले. मुलाचे वडील आणि आजोबा यांच्यावरही अपहरण आणि बेकायदेशीर तुरुंगवासाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपावरून पोलीस या दोन्ही व्यक्तींची चौकशी करतील, अशी अपेक्षा आहे.

पुणे पोर्शे क्रॅश प्रकरणात, कायदेशीर ड्रायव्हिंगचे वय चार महिने कमी आणि कायदेशीर दारू पिण्याचे वय सुमारे आठ वर्षांपेक्षा कमी असलेल्या एका किशोरवयीन मुलाने १९ मे रोजी २४ वर्षीय आयटी व्यावसायिक अनिश अवधिया आणि अश्विनी कोष्टा यांची हत्या केली होती. सर्वात अलीकडील ट्विस्ट म्हणजे मुलाच्या रक्त तपासणीच्या निकालांमध्ये फेरफार केल्याच्या आरोपाखाली सरकारी, ससून रुग्णालयातील दोन डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे.

पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले की, रक्तातील अल्कोहोलची संभाव्य पातळी निश्चित करण्यासाठी फॉरेन्सिक चाचणीसाठी रुग्णालयातून पाठवलेले नमुने किशोरवयीन नव्हते. याचा अर्थ असा आहे की नमुने बदलले गेले, असे कुमार यांनी पत्रकारांना सांगितले. पुण्याच्या उच्च पोलीस अधिकाऱ्यांनी पुष्टी केली की, १९ मे रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास, ससून हॉस्पिटलमध्ये घेतलेला रक्ताचा (किशोराचा) नमुना डस्टबिनमध्ये टाकण्यात आला होता. दुसऱ्या व्यक्तीचा नमुना प्रयोगशाळेत पाठवण्यात आला होता. मुख्य वैद्यकीय अधिकारी श्रीहरी हाल्नर यांनी नमुना बदलला.

## संपादकीय

# आरोग्य आणि वायुतत्त्व

सुखी जीवन मिळविण्याकरिता वायुतत्त्व म्हणजेच प्राणवायुची आवश्यकता आहे. आजच्या तणावपूर्ण जीवनात ध्यान, योगासन- प्राणायाम, सूर्यनमस्कार आदी वायुतत्त्व विषयक क्रियेद्वारे दिनचर्या बदलामुळे झालेले आजार, वायुदोषामुळे होणारे अनेक प्रकारचे आजार यावर मात करता येऊ शकते.

आरोग्य हीच संपत्ती आहे, असे अगदी बालपणापासून ऐकत आलो आहोत; मात्र आजची परिस्थिती.. पैशाने आरोग्य विकत घेण्याची स्पर्धा सुरू आहे; परंतु तेही शक्य नसल्याचे आता कळू लागले आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध बरा! हे कळल्यास आपण आरोग्य कसे टिकवायचे याचा विचार नक्कीच करू.

समाज जीवनात गरीब-श्रीमंत सर्वांनाच निरोगी, तसेच सुखी जीवन मिळविण्याकरिता वायुतत्त्व म्हणजेच प्राणवायुची आवश्यकता आहे. आजच्या तणावपूर्ण जीवनात ध्यान, योगासन- प्राणायाम, सूर्यनमस्कार आदी वायुतत्त्व विषयक क्रियेद्वारे दिनचर्या बदलामुळे झालेले आजार, वायुदोषामुळे होणारे अनेक प्रकारचे आजार यावर मात करता येऊ शकते. वायुतत्त्वाचे दोन महत्त्वाचे गुण म्हणजे 'शब्द व स्पर्श' आहेत. यात गतिमान तत्त्व प्राधान्याने असते. बाह्य वातावरणात बघितले, तर झाडा-पानाचे हलणे, सर्वत्र गतिमानता असणे, कुठलाही प्रकारचा वास नाकासारख्या इंद्रियापर्यंत पोहचविणे, शब्दांना कानापर्यंत, छोट्या छोट्या गोष्टींना एकत्र करून शारीरिक दृष्ट्या सर्व इंद्रियांना गतिमान करणे, त्यास कार्यशक्ती प्रदान करणे हे महत्त्वाचे कार्य असते.

प्रात:काळची आरोग्यदायी हवा,<br>
सदा सर्वदा मानवते जीवा।<br>
प्रसन्नता देई ऋतु ते धवा। सर्व प्राणीमात्रांसी।।<br>
सर्व वने-राने जागी होती, पुष्पे सारी विकास पावती।<br>
पशुपक्षीही नेहमी उठती। प्रात:काळी।।

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये आरोग्य अध्यायात निसर्गाचे व आरोग्याचे वर्णन करताना प्रात:काळी उठणे कसे आरोग्यास हितावह आहे याचे विवेचन केले आहे. हीच वेळ असते जेव्हा वायुतत्त्व आणि मानवी शरीराचा संपर्क आल्यास निरोगी राहणे सहज होते. संपूर्ण शरीरावर वायुतत्त्वाचा प्रभाव कायम राहिला पाहिजे म्हणून सकाळी लवकर उठण्याची व नियमित लवकर झोपण्याची सवय अंगी लावली पाहिजे. आपली दिनचर्या निसर्गनियमानुसार ठेवून त्यानुसार क्रियाकलाप केले पाहिजे, तरच आपण निरोगी राहू शकतो. याकरिता ब्रह्ममुहूर्तावर उठण्याची व पंचतत्त्वांपैकी वायुतत्त्वाच्या सान्निध्यात राहून आरोग्य मिळविण्याची गरज अधिक महत्त्वाचे ठरते.

यावेळी उठल्याने अनेक महत्त्वाच्या गोष्टी घडतात ज्या दिवसभराच्या कामासाठी लागणारी उर्जा देत असतात. याशिवाय रक्तशुद्धीकरिता यावेळी केलेल्या आरोग्यवर्धक क्रिया महत्त्वाच्या असतात. यावेळेस आझोन वायू पृथ्वीच्या सर्वात खालच्या थरात अधिक प्रमाणात असतो, आणि सूर्योदय होण्यापूर्वी म्हणजेच पहाटे साडे पाच पूर्वीच असतो. ओझोनमध्ये मानवास श्वसनासाठी आवश्यक असणारा प्राणवायू (ऑक्सिजन) मोठ्या प्रमाणात असतो. रक्तशुद्धीसोबतच रक्तात ऑक्सिजनचे प्रमाण वाढल्याने हिमोग्लोबिन सुधारते, त्यामुळे नव्वद टक्के रोगांपासून मुक्ती मिळते. प्रात:काळी वायुतत्त्व जास्त प्रमाणात सक्रीय असल्याने मानवी शरीरातील अपानवायू हा अधिक कार्यरत असतो. याचे प्रमुख कार्य मलनि:सारण व शरीरशुद्धीचे कार्य करणे, तसेच मल बाहेर टाकण्याचे कार्य कोणताही जोर न लावता सहजतेने होऊ शकते. आज अनेक लोकांना मूळव्याधीच्या समस्या आहेत. जे उशिराने झोपून उठतात, शौचास उशिरा जातात त्यांना मलनि:सारणाच्या समस्या निर्माण होतात. मूळव्याधी संदर्भात आजार होऊ नये म्हणून, उत्तम शरीरशुद्धी व्हावी म्हणून लवकर उठावे व मलनि:सारण करावे. खरेतर जैविक घड्याळाप्रमाणे या काळात मोठ्या आतड्यांमध्ये आपली ऊर्जा कार्यरत असते. यासोबतच प्रात:काळी सूर्योदयाच्या आधी स्नान केल्यास त्वचेची रंध्रे मोकळी होतात. त्यामुळे शुद्ध हवा शोषली जाऊन सर्व अवयवांना शुद्ध प्राणवायू मिळतो. यावेळेस अनेक प्रकारच्या आरोग्यदायी लहरी वातावरणात असल्याने, सूर्यकिरणांद्वारे येत असल्याने त्या त्वचेद्वारे शोषल्या जातात.

प्रात:काळ म्हणजेच आयुर्वेदात वर्णन केलेला 'ब्रह्ममुहूर्त' रात्रीचा चौथा प्रहर जो ०३.४५ ते ५.३० असा पावणे दोन तासांचा असतो. यावेळी वातावरणात वायुतत्त्व सक्रीय असते, यालाच प्राणवायू असे म्हणतात. याचे शरीरातील स्थान नाकापासून ते मानेपर्यंत आहे. संपूर्ण शरीरात वहनाचे कामे हे वायुतत्त्व करीत असल्याने उपचारपण संपूर्ण शरीरावर केले जातात. फुफ्फुसातील वायुकोष, पेशीतील, मेंदुमधील व सायनस मधील पोकळ्या इत्यादीमध्ये वायुतत्त्व असते. संदेशवहन, अभिसरण, उत्सर्जन, पोषणरस पुरविण्याचे व क्रिया करण्याचे कार्य विविध घटक व अवयवांमार्फत वायुतत्त्वच घडवून आणत असते.

त्यामुळेच योग्य पाचनक्रिया व पोषण व उत्सर्जनाचे कार्य केल्याने रोगनिवारण होते. म्हणूनच सकाळच्या वेळेस या उपचारात वायूसेवन, योगासने, प्राणायाम, लांब श्वास घेण्याच्या क्रिया केल्याने प्राणवायूचे प्रमाण वाढून स्नायूमधील लवचिकता कायम राहते. ऑक्सिजनचे प्रमाण वाढून कॉर्बनडॉय ऑक्साईडचा निचरा होऊन विजातीय पदार्थांचे टॉक्सिनचे प्रमाण कमी होऊन रोगनिवारण होण्यास मदत होते. शरीरात पाचही तत्त्वांचा समतोल राखला जातो. वायुतत्त्वाचे उपचार स्नायुंचे आजार, हृदयरोग, फुफ्फुसाचे आजार, दमा, पित्ताचे आजार, ब्लडप्रेशर इत्यादीवर उपयुक्त ठरतात.

# तुरीची भाववाढ बियाणे कंपन्यांच्या डोळ्यात

**वर्धा :** यावर्षी बियाण्याच्या दरवाढीने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे. तुरीच्या बियाण्याच्या दरात किलोमागे तब्बल शंभर रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे तुरीच्या लागवड खर्चात वाढ होणार आहे. याकरिता मागील वर्षीचे तुरीचे घटलेले उत्पादन आणि बाजारात वाढलेले तुरीचे दर ही कारणे दिली जात आहेत. तुरीच्या वाढलेल्या दराचा निकष लावल्या जात असला तर अनेकांना तूर पिकलीच नाही आणि अनेकांना सात ते आठ हजार रुपयांपर्यंत दराने विकावी लागली. अशात बियाण्याची दरवाढ शेतकऱ्यांच्या चिंतेत भर टाकणारीच आहे. मागील वर्षी तुरीच्या उत्पादनात नैसर्गिक कारणांनी घट झाली.



वर्धा जिल्ह्यात कपाशी, सोयाबीन पाठोपाठ तुरीची लागवड होते. मोठ्या संख्येने शेतकरी तुरीची लागवड करतात. मात्र यावर्षी तुरीच्या बियाण्याच्या दरामध्ये वाढ झाल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. त्याचा परिणाम शेतीच्या अर्थकारणावर होणार आहे

मागील वर्षी अनेक शेतकऱ्यांना तुरीचे उत्पादनात घट आली. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले. अशात आधीच नुकसान झालेले असताना आणि आर्थिक अडचणीत असताना कंपन्यांनी केलेली दरवाढ शेतकऱ्यांना डोकेदुखी ठरणारी आहे.

सुरूवातीला कमी त्यानंतर सलग पाऊस, पाऊस, मोठ्या प्रमाणात आदी कारणांचा तुरीच्या परिणाम झाला. त्यामुळे शेतकऱ्यांना तुरीचे उत्पादन कमी झाले. यावर्षी चक्क १०० रुपयांपर्यंत प्रती असे असताना यावर्षी तुरीचे भाव वाढले. किलोमागे दरवाढ करण्यात आली आहे.

पाऊस, तुरीचे दर प्रतिक्विंटल बारा हजार अवकाळी रुपयांपर्यंत पोहोचले. तुरीचे बाजारभाव पडलेले धुके तेजीत असल्याने इकडे बियाण्याच्याही पिकावर दरात वाढ झाली. मागील वर्षी तुरीचे अनेक बियाणे २५० रुपये किलोपर्यंत होते. मात्र त्यात ज्या कंपन्यांच्या बियाण्याला शेतकऱ्यांची पसंती जास्त असते, अशा कंपन्यांच्या दरात थेट शंभर रुपयांची वाढ झाल्याचे सांगण्यात येते. तुरीच्या बियाण्याच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. कंपन्यांनी तुरीच्या बियाण्याच्या दरात वाढ केल्यामुळे तुरीच्या उत्पादन खर्चात देखील वाढ होणार आहे. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या बजेटवर होणार आहे. तुरीच्या बियाण्याच्या दरात प्रती किलो शंभर रुपयांची दरवाढ केल्याने शेतकऱ्यांची चिंता मात्र वाढलेली आहे.

# महिला भर उन्हात सरपनाच्या शोधात

**परभणी :** राशन दुकानावर मिळणारे रॉकेल बंद झाल्यानंतर शासनाने उज्वला योजना आणली त्या अंतर्गत मोठ्या प्रमाणावर लाभार्थी असून दर महा एक गॅस सिलेंडर मिळते मात्र सिलेंडरचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने हातावर पोट भरणाऱ्या कुटुंबांना गॅस) परवडत नाही. उज्वला योजनेतील लाभार्थी पुन्हा चुलीकडे वळले आहेत अनेक महिलांच्या डोक्यावर लाकडाची मोळी दिसून येत आहे दिवसेंदिवस महागाई वाढत चालली आहे सद्यस्थितीत सर्वच जीवनावश्यक वस्तूचे भाव गगनाला भिडले आहेत.

**हातावर पोट भरणाऱ्या कुटुंबाना गॅस परवडेना**

त्यातच गॅस सिलेंडरचे दरही हजाराच्या आसपास गेल्याने गोरगरिबांचे बजेट बिघडले आहे रॉकेल आता बंद झाल्याने गोरगरिबांना चूल पेटवावी लागत आहे ग्रामीण भागातील महिलांना भर उन्हात जंगलातून लाकडी आणून स्वयंपाक करावा लागतो यामुळे महिलांना धुरापासून त्रास होतो यापासून मुक्तीसाठी शासनाने सिलेंडरवर सबसिडी देण्याचा निर्णय घेतला सुरुवातीला सबसिडी बऱ्यापैकी मिळत होती मात्र ही सबसिडी टप्प्याटप्प्याने अत्यल्प करण्यात आली गोरगरिबांना गॅसच्या वाढत्या किमतीत सिलेंडर घेणे परवडत नाही.

घराघरात विविध शासकीय योजनेतून गरीब कुटुंबांना निशुल्क गॅसची जोडनी देण्यात आली मात्र मागील काही वर्षात सिलेंडरच्या दरात तिपटीने वाढ झाली त्यामुळे एकदा संपलेला गॅस गरीब कुटुंबांना घेण्यास परवडत नसल्यामुळे महिलांना सरपन शोधून चुलीवरच स्वयंपाक करावा लागत आहे गॅस सिलेंडरचे वाढलेले दर कमी करण्याची मागणी महिला करत आहे

# दहावी परीक्षेत आझम कॅम्पसच्या २ शाळांचा शंभर टक्के निकाल

**पुणे :** दहावी परीक्षेत महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कूल,अँग्लो उर्दू बॉईज स्कूल या शाळांचा निकाल शंभर टक्के लागला. एमसीईएस इंग्लिश मिडीयम स्कूल या तिसऱ्या शाळेचा निकाल ९८.४८ टक्के लागला.येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.



अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कूल मध्ये उझमा असद खान ही विद्यार्थिनी ९५.४० टक्के गुण मिळवून प्रथम आली.अँग्लो उर्दू बॉईज हायस्कूलच्या उर्दू माध्यमात शाहबुद्दीन सलीम हावरे हा विद्यार्थी ८७.८० टक्के गुण मिळवून प्रथम आला.

इंग्रजी माध्यमात शेख फहद शमिम हा विद्यार्थी ९३ टक्के गुण मिळवून प्रथम आला. एमसीईएस इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शेख अलिशा शफिक ही विद्यार्थीनी ९० टक्के गुण मिळवून प्रथम आली.

महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.पी.ए.इनामदार,उपाध्यक्ष आबेदा इनामदार,सचिव प्रा.इरफान शेख,अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका रोशन आरा शेख, अँग्लो उर्दू बॉईज हायस्कूलच्या मुख्याध्यापक राज मुजावर,एमसीईएस इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.असफिया अन्सारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दहावीत नागपूर विभागाचा टक्का वाढला, पण राज्यात सर्वात शेवटी

**नागपूर :** इयत्ता दहावीचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला.नागपूरविभागाचा निकाल ९४.७३ टक्के लागला आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत निकालात दोन टक्क्याने वाढ झाली असली तरी राज्यात नागपूर विभाग नवव्या क्रमांकावर आहे. नागपूर विभागाचा विचार केला तर दहावीमध्ये विभागात ९६.११ टक्के घेत गोंदीया जिल्हा अव्वल तर ९२.२ टक्क्यांसह वर्धेचा सर्वात कमी निकाल लागला आहे. नागपूर जिल्हा ९५.१७ टक्के घेत तिसऱ्या क्रमांकावर आहे.

नागपूर विभागीय शिक्षण मंडळाअंतर्गत नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. विभागीय मंडळामार्फत मार्च २०२४ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावीच्या परीक्षेकरिता नागपूर विभागातून १ लाख ५१ हजार ०२ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यातील १ लाख ४९ हजार ८१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून यापैकी १ लाख ४२ हजार ०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

# तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे : एस.बी .मुल्ला

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

तासगांव : रयत शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यालय सावळज या ठिकाणी १९९८१९९९ मध्ये शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा अत्यंत उत्साह मध्ये पार पडला. प्रथमतः कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अर्ध पुतळ्याचे पूजन केले. अध्यक्ष स्थानी माजी शिक्षक एस. बी. मुल्ला सर होते. ते म्हणाले तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे त्याचप्रमाणे आपल्या शालेय आठवणी कायम जाग्या ठेवाव्या वरिष्ठांचा सन्मान करावा, इतरांना मदत करा जर असे केले तर जीवनात कधीही काहीही कमी पडत नाही .त्याचप्रमाणे त्यांनी योगाचे महत्त्व पटवून दिले कार्यक्रमासाठी निवृत्त शिक्षक एम. आर.पाटील सर, निवृत्त शिक्षक पोळ सर ,कुंभार सर, आणि माजी शिपाई मामा रघुनाथ कलाल तसेच शाळेचे मुख्याध्यापक एस.एम.पाटील सर यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे ठिकाणी अतिशय उत्साहाचं आणि आठवणी मध्ये रममान झालेले वातावरण होते या वेळेला सर्व विद्यार्थ्यांनी आपापले मनोगत व्यक्त केले आणि शाळेबद्दल गुरुजनाबद्दल , सध्याच्या जीवनाबद्दल किस्से , विविध आठवणी जाग्या केल्या. आणि इथून पुढे शाळेला सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले.

संयोजन अमोस सावळजकर, हणमंत पाटील यांनी केले.कार्यक्रमाचे प्रस्तावना विजय मोरे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार अण्णासाहेब कांबळे यांनी मानले.

# दहावी परीक्षेत नॅशनल पब्लिक स्कुलचा सलग पाचव्या वर्षी शंभर टक्के निकाल




**पुणे :** अक्सा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित नॅशनल पब्लिक स्कुल ( जाधवनगर,कात्रज) चा निकाल दहावी(शालांत) परीक्षेत शंभर टक्के लागला असून सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळवले आहे.सलग पाचव्या वर्षी नॅशनल पब्लिक स्कुल चा निकाल शंभर टक्के लागला आहे.

प्रसाद सिद्धाराम पागा या विद्यार्थ्याने ८८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. रितेश संजय वर्मा ने ८५.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला.मुख्याध्यापक सौ.अंजुम फिरदौस पटेल, संस्थापक ऍडव्होकेट तारिक अन्वर पटेल,सर्व संचालक,शिक्षक वर्गाने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.'अक्सा चॅरिटेबल ट्रस्ट ही अल्पसंख्यांक शिक्षण कायद्याखाली नोंद झालेली शिक्षण संस्था असून गरीब,सर्वसाधारण कुटुंबातील विद्यार्थी येथे शिकतात.अभ्यासाबरोबर त्यांच्या सर्वांगीण विकासाचे उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात',असे संस्थापक ऍडव्होकेट पटेल यांनी सांगितले.

# तासगावात 'कृषीहित' प्रदर्शन १६ ते २० ऑगस्ट दरम्यान होणार

**तासगाव :** तासगाव येथे १६ ते २० ऑगस्ट दरम्यान, तासगाव येथील दत्त मंदिर मैदानावर भव्य कृषीहित प्रदर्शनाच्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रदर्शनाचे आयोजक युवानेते रोहितदादा आर. पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. तसेच, १६ ऑगस्टला स्व.आर.आर. (आबा) पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून कृषीहित प्रदर्शनात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना युवा शेतकरी पुरस्कार, महिला पुरस्कारही देण्यात येणार आहे असेही रोहित दादांनी सांगितले.



या पत्रकार परिषदेत युवानेते रोहितदादा पाटील यांच्या समवेत तालुकाध्यक्ष विश्वास (तात्या) पाटील, सतीश पवार, अमोल शिंदे, शहराध्यक्ष ऍड.गजानन खुजट, युवा शहराध्यक्ष अभिजीत पाटील व आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

कृषीहित प्रदर्शनाचा उद्देश कृषी क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाद्वार क्रांती घडवणे असून कृषी व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञाशी नेटवर्किंग घडवून आणणे हा आहे. या प्रदर्शनात विविध विषयावर कार्यशाळा, सेमिनार आयोजित करण्यात येणार आहे. या ठिकाणी थेट प्रात्यक्षिक (डेमो) क्षेत्रही असणार आहे. विविध कृषी उत्पादने आणि प्रयोगशील शेतकऱ्यांमुळे सांगली जिल्ह्याला देशात लौकिक प्राप्त झाला आहे. अशा या कृषिवलांना कृषी क्षेत्रातील नवनवीन घडामोडींची माहिती करून देण्यासाठी मागील वर्षांपासून कृषिहित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे.

या शृंखलेतील दुसऱ्या कृषी प्रदर्शनाची तयारी सुरू झाली असून आंतरराष्ट्रीय पातळीचे कृषी उद्योग, कृषी उत्पादने व नवनवीन संशोधन करणाऱ्या संस्थांना सहभागासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे.

कृषीहित प्रदर्शनाचे हे दुसरे वर्ष असून प्रदर्शनात दोनशेहून अधिक कंपन्यांचा सहभाग असणार आहे. कृषी निविष्ठा उत्पादक, बियाणे, कृषी अवजारे, ट्रॅक्टर, ठिबक व तुषार सिंचन, फवारणी यंत्रे उत्पादक कंपन्या, बँका, विमा कंपन्या, कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्रे, कृषी विज्ञान केंद्रे, विविध कृषिपूरक उद्योग, रोपवाटिका, अन्नप्रक्रिया उद्योग तसेच कृषीविषयक शासकीय विभागांचा प्रदर्शनात सहभाग असणार आहे. दोन लाखाहून अधिक शेतकरी या प्रदर्शनाला भेट देतील असा विश्वास यावेळी रोहित दादांनी व्यक्त केला .

कृषीहित प्रदर्शन तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, प्रिसीजन फार्मिंग, कृषी विपणन धोरणे, उत्पादकता वाढ, सर्वोत्तम शेती पद्धती, क्षमता सहयोग, नफ्यात वाढ, नवकल्पनेचा ट्रेंड जाणणे इ. अपेक्षांच्या मुद्यावर आधारित असणार आहे. कृषीहित प्रदर्शनात शेतीची यंत्रे आणि उपकरणे, पीक संरक्षण आणि पोषण, अचूक कृषी तंत्रज्ञान, शाश्वत शेती पद्धती, कृषी रसायने आणि खते, बियाण्याच्या जाती आणि आनुवंशिकी, सिंचन आणि जल व्यवस्थापन प्रणाली, कृषी व्यवसाय आणि वित्त, व्हर्टिकल शेतीचे तंत्र, कृषी क्षेत्रातील ड्रोन ऍप्लिकेशन्स, मातीचे आरोग्य आणि संवर्धन, स्मार्ट सिंचन उपाय, एकात्मिक कीड व्यवस्थापन, सेंद्रिय शेती पद्धती, कृषी व्यवसाय स्टार्ट-अप धोरणे, हवामानास अनुकूल पीक वाण अशा विषयावर उत्पादन प्रात्यक्षिके, कार्यशाळा इ. उपक्रम होणार आहे.

शेतकऱ्यांसाठी कृषीहित प्रदर्शनाच्या माध्यमातून विविध विषयावर माहिती व संवाद साधण्यासाठी एक पर्वणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कृषीहित प्रदर्शनाच्या स्टॉल बुकिंग व अधिक माहितीसाठी ु.ड्ढीींहळीं.ळप या वेबसाईटवर किंवा ९७६५१६०८५७ (सचिन पाटील), ९६३७६२३६६१ (धोंडीराम झांबरे) या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# बारामतीत ७९ पैकी ३९ शाळा शंभर नंबरी ; तालुक्याचा दहावीचा निकाल ९७.५२ टक्के

**बारामती :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत बारामती तालुक्यातील ७९ पैकी ३९ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. तालुक्याचा एकूण निकाल ९७.५२ टक्के लागला. तालुक्यात ६२५२विद्यार्थीपरीक्षेला बसले होते. त्यातील ६०९७विद्यार्थीउत्तीर्ण झाले. २०२३ मध्ये तालुक्याचा निकाल ९७.७१ टक्के,२०२३ मध्ये ९६.५५ टक्के लागला होता.

तुलनेने यंदा निकालात ०९७ टक्के वाढ झाली आहे.तसेच २०२३ मध्ये ४६ शाळांचा,तर २०२३ मध्ये २९ शाळांचा निकाल १०० टक्के लागला होता. यंदाच्या वर्षी १० शाळांची १०० टक्के निकालात वाढ झाली आहे.



**तालुक्यातील शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळा पुढीलप्रमाणे -** नवमहाराष्ट्र विद्यालय पणदरे,न्यू इंग्लीश स्कुल वाणवडी,विद्या प्रतिष्ठान बाल विकास मंदीर माध्यमिक शाळा,श्री शिरसाइ विद्यालय शिर्सुफळ,न्यु इंग्लीश स्कुल पंधारवस्ती,चोपडज, श्री छत्रपती हायस्कुल सोनगांव,शारदाबाई पवार विद्यानिकेतन शारदानगर,न्यू इंग्लिश स्कूल मेखळी,विद्या प्रतिष्ठान मराठी माध्यमिक हायस्कुल, बारामती,विठ्ठल माध्यमिक विद्यालय कांबळेश्वर पणदरे,खांडेश्वरी माध्यमिक विद्यालय खांडज,माध्यमिक विद्यालय गडदरवाडी खंडोबाचीवाडी, श्री.बी.एस.काकडे (देशमुख) विद्यालय निंबुत,श्री भैरवनाथ विद्यालय बाबुर्डी,भैरवनाथ विद्यालय कोऱ्हाळे खुर्द, न्यू इंग्लिश स्कूल ढाकाळे,उर्दू माध्यमिक विद्यालय बारामती,भैरवनाथ माध्यमिक विद्यालय मेडद,उत्कर्ष माध्यमिक आश्रमशाळा वाघळवाडी, जनहित प्रतिष्ठान विद्यालय तांदुळवाडी बारामती,विद्या प्रतिष्ठा न्यू इंग्लिश मिडियम स्कूल बारामती,इंग्लिश मिडियम स्कूल माळेगांव बारामती,विजय बालविकास मंदिर बांदलवाडी,श्री. सिद्धेश्वर पब्लिक स्कूल कोऱ्हाळे बुद्रूक,राजे प्रतिष्ठान न्यू इंग्लीश मिडीयम स्कुल खंडूखैरेवाडी,सोमेश्वर पब्लीक स्कुल,शारदा निकेतन इंग्लीश मिडीयम स्कुल,शारदाबाइ पवार विद्या निकेतन डे स्कुल,संत सावतामाळी पब्लीक स्कुल,चैतन्य इंटरनॅशनल स्कूल बारामती,क्रिएटीव्ह इन स्कूल बारामती,ज्ञानसागर इंग्लिश मिडियम स्कूल सावळ,आदित्य इंटरनॅशनल स्कूल वंजारवाडी,सुपे इंग्लीश मिडीयम स्कुल,बीएकेअेपी इंग्लीश मिडीयम स्कुल,या शाळांचा निकाल १०० टक्के जाहिर झाला.अन्य शाळांच्या निकालाची टक्केवारी पुढीलप्रमाणे...एमईएस हायस्कुल बारामती- ९९.५६ , श्रीमंत शंभूसिंह विद्यालय माळेगाव बुद्रूक - ९३.३९, छत्रपती शाहू विद्यालय बारामती - ८८.६३,मिशन हायस्कुल बारामती ८०, स्वातंत्र्य विद्यामंदिर वडगाव निंबाळकर - ९४.२५,वस्तीगृह विद्यालय कार्हाटी ९८.१८. श्री. शहाजी हायस्कूल सुपे-९८.३७, के.बी.पाटील विद्यालय सांगवी- ९४.१६,श्री छत्रपती शिवाजी विद्यालय मुर्टी ९५.०८,

मयुरेश्वर विद्यालय मोरगांव ९६.४५,न्यु इंगलीश स्कुल डोर्लेवाडी ९६.२४,श्री भैरवनाथ जनसेवा विद्यालय उंडवडी ९७.१५,आर. एन. आगरवाल विद्यालय बारामती- ९९.६७,श्री सिद्धेश्वर हायस्कूल कोऱ्हाळे बुद्रूक - ९६.०३,न्यू इंग्लिश स्कूल कारखेल ९४.५४,सोमेश्वर विद्यालय सोमेश्वरनगर ९७.५८,एस पवार विद्यालय ॲण्ड ज्यु.कॉलेज शिवनगर बारामती ९९.३९,आनंद विद्यालय होळ ९३.६१,न्यू इंग्लिश स्कूल लोणी भापकर ९४.५६,सोमेश्वर विद्यालय अंजनगाव - ९५.१२,श्री. विठ्ठल माध्यमिक विद्यालय भिकोबानगर ९७.७५,न्यू इंग्लिश स्कूल खलाटेवस्ती लाटे ९३.५४,वाघेश्वरी विद्यालय निरावागज ९८.७८,

कै. जिजाबाइ गावडे विद्यालय पारवडी ९७.६७,हौसाबाई घोरपडे विद्यालय पिंपळी९०.६२,वसंतराव पवार विद्यालय देऊळगांव रसाळ ९८.११,माध्यमिक विद्यालय करंजे सोरटेवाडी ९६.५५,कै. धो.आ.सातव माध्यमिक विद्यालय बारामती ९५.२३,सोमेश्वर विद्यालय मुढाळे ९०.६९,श्री छत्रपती हायस्कुल काटेवाडी ९५.८३,न्यू इंग्लिश स्कूल गोजुबावी ९५.१२,न्यू इंग्लिश स्कूल नारोळी ९५.६५,श्री छत्रपती हायस्कुल निंबोडी ६५.२१,कै.अनंतराव पवार माध्यमिक विद्यालय पळशी ९०.३२,कवि मोरोपंत शिक्षण संस्था माध्यमिक विद्यालय ९७.५६,अजितदादा इंग्लीश मिडीयम स्कुल ९९.३६.

रावेर तालुक्यात दुसऱ्या दिवशीही वादळी पाऊस, केळी बागांचे नुकसानइूऑनलाइन लोकमत। झ्ीलश्रळीहशव:चरू २६, २०२४ ११:४७ झचगेळप ी सात ते आठ गावे अंधारात, मुक्ताईनगरातही पाऊस. रावेर तालुक्यात दुसऱ्या दिवशीही वादळी पाऊस, केळी बागांचे नुकसानकिरण चौधरी, रावेर (जि.जळगाव) : रावेर तालुक्याच्या काही भागात वादळी पावसाने रविवारी दुसऱ्या दिवशीही तडाखा दिला. यामुळे काही केळीबागा व मोठे वृक्ष व वीज रोहित्रांसह वीजतारा तुटून जमीनदोस्त झाल्या. त्यामुळे सात ते आठ गावे अंधारात आहेत.-ऊ्नएठढखडएचएछ्ढरावेर तालुक्यातील खिरोदा प्र. यावल, चिनावल, सावखेडा, वाघोदा, सावदा, तांदलवाडी, उदळी या भागात रविवारी सायंकाळी पुन्हा वादळी पाऊस झाला. शनिवारी व रविवारी सुमारे १२५ ते १५० वीजखांब व सहा ते सात वीजरोहीत्र निकामी झाल्याने महावितरणचे अंदाजे ७५ लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.मुक्ताईनगर शहरासह परिसरात दुसऱ्या दिवशी रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली.

# बघा आणि थंड बसा' या एकांकिकेला उपविजेतेपद

## आनंदयात्री करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत 'बघा आणि थंड बसा' ला उपविजेतेपद

पुणे : आनंदयात्री करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत भारत इंग्लिश स्कूल, शिवाजीनगर या संघाने सादर केलेल्या 'बघा आणि थंड बसा' या एकांकिकेने उपविजेतेपद पटकावले आहे.लेखन, दिग्दर्शन ,नेपथ्यासह चार पारितोषिके या एकांकिकेने मिळवली.

रामकृष्ण मोरे सभागृहात नुकत्याच संपन्न झालेल्या या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रासह बडोदा आणि बंगळुरू मधून ५० संघ आले होते. शास्त्रिय गायक रघुनंदन पणशीकर, लेखिका विनिता पिंपळखरे, नाट्यकर्मी संजय डोळे,वसंत भडके यांच्या हस्ते दि.२६ मे रोजी सायंकाळी पारितोषिक वितरण झाले. पुण्याने चार पारितोषिके खेचून आणल्याने सर्व कलाकारांनी जल्लोष केला.



'बघा आणि थंड बसा ' ही ज्वलंत विषयावरील ही नवी कोरी कथा साकार करताना भारत ईंग्लिश स्कूल, शिवाजीनगरच्या मुख्याध्यापिका वर्षा क्षीरसागर आणि त्यांच्या वीस विद्यार्थ्यांनी लक्षणीय सहभाग घेतला.तेजश्री रांगडे,समृद्धी पैठणकर,डॉक्टर धनंजय पाटील,वरुण पुराणिक,आरती आपटे,तनया आघाव,गिरीश मुरुडकर,मधुसूदन पाटील,अभिजित दिवाकर,वैभव पाध्ये,सुधीर उत्तरकर ,प्रसाद देशपांडे या कलाकारांनी प्रभावी अभिनय केला. या एकांकिकेचे लेखन, दिग्दर्शन ,नेपथ्य गिरीश मुरुडकर यांनी केले आहे. प्रेक्षकांच्या आग्रहाखातर भरत नाट्य मंदिरात लवकरच या एकांकिकेचा प्रयोग आयोजित करत आहोत असे गिरीश मुरुडकर यांनी सांगितले.

# तयारी विधानसभेची; स्वबळा'ची चाचपणी, पण कोल्हापूर जिल्ह्यात ताकदीचे उमेदवार कुठे आहेत?

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीचा धुरळा अजून खाली बसायचा असताना राजकीय पक्षांनीविधानसभानिवडणुकीची तयारी सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीतील जागा वाटपातील ताणाताणी पाहता,विधानसभास्वबळावर लढावी का? अशी चर्चा मोठ्या पक्षांत सुरू आहे. मात्र,कोल्हापूरचाविचार केला तर येथे बहुतांशी पक्षांकडे दहाच्या दहा मतदारसंघांत ताकदवान उमेदवार नसल्याने त्यांची कोंडी होऊ शकते. मात्र, महाविकास आघाडी आणि महायुती एकसंध राहिली तर विधानसभेला प्रत्येक मतदारसंघात काट्याची टक्कर पाहायला मिळणार हे निश्चित आहे.

राज्यात गेल्या पाच वर्षांत अनेक राजकीय उलथापालथी झाल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणूक पार पडली. महायुती व महाविकास आघाडीमध्ये सरळ लढत झाली असली, तरी जागा वाटप करताना दोन्हीकडील नेत्यांची दमछाक झाली. अनेक ठिकाणी नाराजीचा फटकाही बसला. लोकसभेला ही अवस्था तर विधानसभेला इच्छुकांची संख्या आणि वाटणीला येणाऱ्या जागा पाहता, मोठ्या प्रमाणात बंडखोरी होणार आहेत. त्यामुळे मोठ्या राजकीय पक्षांनी सावध भूमिका घेत स्वबळ आजमावले तर काय होऊ शकते? याची चाचपणी सुरू केली आहे. लोकसभेच्या निकालानंतर कोणी कोणत्या मतदारसंघात मदत केली आणि कोणी टांग मारली हे उघड होणार असल्याने त्यानंतरच स्वबळावर की एकत्रित लढायचे, याचा निर्णय होऊ शकतो.

कोल्हापुरात दहा विधानसभा मतदारसंघांतील स्थिती पाहिली तर दहाच्या दहा ठिकाणी ताकदवान उमेदवार एकाही राजकीय पक्षाकडे नाही. त्यामुळे स्वबळाची चाचपणी असली तरी येथे एकमेकांचा हात धरूनच निवडणूक लढवावी लागणार आहे.

**असे आहेत पक्षनिहाय आमदार**

मतदारसंघ - आमदार - पक्षशिरोळ - राजेंद्र पाटील-यड्रावकर - अपक्षइचलकरंजी - प्रकाश आवाडे - अपक्षहातकणंगले - राजू आवळे - काँग्रेसशाहूवाडी - विनय कोरे - जनसुराज्यकागल - हसन मुश्रीफ - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चंदगड - राजेश पाटील - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)राधानगरी - प्रकाश आबीटकर - शिंदेसेना कोल्हापूर उत्तर - जयश्री जाधव - काँग्रेस कोल्हापूर दक्षिण - ऋतुराज पाटील - काँग्रेस करवीर - स्वर्गीय पी. एन. पाटील - काँग्रेस



**येथे होणार त्रांगडे..**

महायुती:

कागल - हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी), समरजीत घाटगे (भाजप)

चंदगड - राजेश पाटील (राष्ट्रवादी), शिवाजी पाटील, संग्राम कुपेकर (भाजप)

राधानगरी - प्रकाश आबीटकर (शिंदेसेना), के. पी. पाटील (राष्ट्रवादी)

इचलकरंजी - प्रकाश आवाडे (ताराराणी), सुरेश हाळवणकर (भाजप)

कोल्हापूर उत्तर - राजेश क्षीरसागर (शिंदेसेना), सत्यजित कदम व महेश जाधव (भाजप)

शिरोळ - राजेंद्र पाटील-यड्रावकर (शिंदेसेना), माधवराव घाटगे (भाजप)

करवीर - चंद्रदीप नरके (शिंदेसेना), संताजी घोरपडे (जनसुराज्य)आघाडी :

कोल्हापूर उत्तर - जयश्री जाधव व मालोजीराजे (काँग्रेस ), संजय पवार (उद्धवसेना)

हातकणंगले - राजू आवळे (काँग्रेस), राजीव आवळे (राष्ट्रवादी शरद पवार गट), सुजित मिणचेकर (उद्धवसेना)

## सुमारे १३ लाखांची वीज चोरी,

**चिपळूण :** गेल्या पंधरा महिन्यांपासून ७६ हजार ९३ युनिट्स चा वापर करत महावितरणचे १३ लाख ३४ हजार ३९० रुपयांची वीज चोरी केल्याचा प्रकार खेड तालुक्यातील तळघर येथे घडला आहे. याप्रकरणी रामचंद्र भागोजी बुदार व राकेश रामचंद्र बुदार या दोघांवर येथील पोलीस स्या संदर्भात महावितरणच्या पेण येथील भरारी पथकातील उपकार्यकारी अभियंता विजय राजेश धरमसारे यांनी तक्रार दिली आहे.

२४ एप्रिल २०२४ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास या कारवाईला सुरुवात झाली. लोटे एमआयडीसी उपविभाग रत्नागिरी जिल्हा यांच्या आख्यारीत येणाऱ्या खेड तालुक्यातील तळघर या परिसरातील वीज चोरी शोधून काढण्यासाठी स्वतः विजय धरमसारे तसेच सहाय्यक अभियंता आशिष मेश्राम, सहाय्यक व अधिकारी शशीकुमार तांबे ,वरिष्ठ तंत्रज्ञ राकेश पाटील यांच्या पथकाने वीज ग्राहक रामचंद्र भागोजी बुदार व वापरदार राकेश रामचंद्र बुदार यांचा ग्राहक क्रमांक २२ २३ ६० ०० २० ५८ या चिरेखानीच्या वीजपुरवठा असलेल्या विज संचाची तपासणी केली.

# विठ्ठल मंदिर मूळ रूपात दिसणार

## गरुड खांबही चांदीने चमकणार

**सोलापूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली सुरू असलेले काम अंतिम टप्प्यात आले आहे. वारकरी भाविकांना विठ्ठल मंदिराचे ७०० वर्षांपूर्वीचे सुंदर रूप पहावयास मिळणार आहे. गरुड खांबही चांदीने चमकणार असल्याचे मंदिरस समितीकडून सांगण्यात आले.



श्री विठ्ठल मंदिर व रुक्मिणी मंदिर गाभारा संवर्धनाचे काम करतेवेळी मूर्तीच्या संरक्षणास कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही याची दक्षता घेऊन कामास सुरुवात करण्यात आली आहे. हे काम पूर्णत्वास येत असून संवर्धनाचे काम दर्जे दार होऊन पुढील अनेक वर्ष टिकेल यादृष्टीने करण्यात आले आहे.

श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील सुरू असलेल्या कामाची पाहणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष औसेकर महाराज, सर्व सदस्य, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने वास्तु विशारद तेजस्विनी आफळे, ठेकेदार येवले, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी केली व संबंधितांना आवश्यक सूचना दिल्या.

मंदिरातील देवाचे गर्भगृह चौखांबी आणि सुळखांबी आता सातशे वर्षांपूर्वी च्या मूळ रूपात येऊ लागली आहेत. गर्भगृहात मूळ रूपातील गाभाऱ्यात देवाचे सावळे रूप खुलून दिसत आहे. दगडांनाही पॉलिश काम सुरू आहे. मंदिराचे संवर्धन व जीर्णोद्धारची कामे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे.

मंदिरातील वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले गरुडखांब यास अलिंगन दिल्यशिवाय वारकरी तृप्तच होत नाही. गरुड खांबास चांदीचा पत्रा लावू नये असे पुरातत्व विभागाचे म्हणणे आहे. कारण या खांबास चांदीचा पत्रा लावल्यास दगडांना श्वास मिळणार नाही दगड खराब होतो. गरुड खांबास कुठल्याही परिस्थितीत चांदी लावावीच लागणार आहे.

# सिद्धेश्वर विद्यालय आलेगावचा निकाल ९७.५ तर देऊळगावचा ८५.०८%

**देऊळगाव राजे :** सिध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देऊळगाव राजे. ता.दौंड जि.पुणे शाळेचा एस.एस.सी.मार्च २०२४ बोर्ड परीक्षा निकाल ८५.०८टक्के लागला असून प्रथम तीन आलेले तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे, प्रथम क्रमांक-कु.वाघमोरे श्रृती रोहिदास - ४६४/५०० - ९०.००%,द्वितीय क्रमांक - कु. काळे सिध्दी सनदकुमार - ४२६/५०० - ८५.२०%

द्वितीय क्रमांक - शिंदे अनिरुद्ध किसन - ४२६/५०० - ८५.२०%,तृतीय क्रमांक - चव्हाण राहुल शरद - ४२३/५०० - ८४.६०% , तर आलेश्वर माध्यमिक विद्यालय आलेगाव इयत्ता दहावी मार्च २०२४ परीक्षेचा निकाल ९७.५%लागला आहे,

**विद्यालयातील प्रथम तीन क्रमांक पुढीलप्रमाणे**

प्रथम भोसले रोहन सुनील.९२.८०%,

द्वितीय कु. धुमाळ प्रगती भाऊसाहेब.९०.८०%,

तृतीय कू काळे तनुजा अजिनाथ.८०%

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सिध्देश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. आप्पासाहेब पवार, उपाध्यक्ष आनंदराव गिरमकर,सचिव हरिश्चंद्र ठोंबरे, खजिनदार संदिप नय्यर,संचालक काळुराम गोरे, चंद्रकांत दरेकर, राजेंद्र वाघमोरे व मुख्याध्यापक किशोर शिंदे , आलेगाव चे मुख्याध्यापक सुभाष भोसले व शिक्षकांनी अभिनंदन केले.



# तासगाव तालुक्यातील अवैध व्यवसाय बंद करा : राष्ट्रवादीची मागणी



**तासगाव :** तासगाव शहरासह तालुक्यात राजरोसपणे अवैद्य व्यवसाय सुरु आहेत. यातून, सर्वसामान्यांसह विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. त्यामुळे तालुक्यातील अवैध व्यवसाय तात्काळ बंद करा अशा मागणीचे निवेदन तासगाव पोलीस निरीक्षक यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार या पक्षाने दिला आहे. तर, तात्काळ अवैध धंदे बंद न झाल्यास पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करु असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

तासगाव शहरासह तालुक्यात मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, कॅफे, गांजा विक्री असे अनेक अवैधपणे व्यवसाय सुरू आहेत. यातून सर्वसामान्यासह विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच, तरुण पिढी व्यसनाधीन बनत आहे. या अवैध व्यवसायांना चाप बसावा यासाठी राष्ट्रवादीचे युवानेते रोहित दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख पदाधिकाऱ्यांनी थेट पोलीस ठाणे गाठून अवैध व्यवसाय तातडीने बंद करा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

तसेच, या निवेदनात, सोमवार २७ मे २०२४ पर्यंत तालुक्यातील सर्व अवैध व्यवसाय बंद करावेत अन्यथा, २८ मे रोजी युवानेते रोहित दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करु असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी, निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीरा उजवा कालवा १० जूननंतरच सुरू



**फलटण :** नीरा उजवा कालव्याचे उन्हाळी हंगाम सन २०२३/२४ चे सिंचन आवर्तन कालव्याची (कि. मी. ४९/९९० मधील) दुरुस्ती करावयाची असल्याने बंद झाले आहे, तथापि आपल्या पाणीपुरवठा योजनेचा तलाव कालवा सुरू असताना नीरा उजवा कालव्याद्वारे पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० % भरून देण्यात आला असल्याचे या पत्राद्वारे निर्दर्शनास आणून देत आपल्या अधिनस्त असलेल्या तलावातील पिण्याचे पाणी दि. १५ जूनपर्यंत पुरेल असे नियोजन करावे. आपणास दि. १० जूनपूर्वी कोणत्याही परिस्थितीत पाणी देता येणार नसल्याचे या पत्रात नमूद असून याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**नीरा उजवा कालव्याचे उन्हाळी हंगाम सन २०२३/२४ चे सिंचन आवर्तन कालव्याची (कि. मी. ४९/९९० मधील) दुरुस्ती करावयाची असल्याने बंद झाले आहे, तथापि आपल्या पाणीपुरवठा योजनेचा तलाव कालवा सुरू असताना नीरा उजवा कालव्याद्वारे पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० ०/प भरून देण्यात आला असल्याचे या पत्राद्वारे निर्दर्शनास आणून देत आपल्या अधिनस्त असलेल्या तलावातील पिण्याचे पाणी दि. १५ जूनपर्यंत पुरेल असे नियोजन करावे. आपणास दि. १० जूनपूर्वी कोणत्याही परिस्थितीत पाणी देता येणार नसल्याचे या पत्रात नमूद असून याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

सदर पत्र ग्रामपंचायत तरडगाव, सुरवडी, वाठार निंबाळकर, निंभोरे, साखरवाडी, वडजल, ढवळेवाडी, सोमंथळी, विडणी, फरांदवाडी, जाधववाडी, सांगवी, पिंप्रद पवारवाडी, साठे, निंबळक / वाजेगाव तसेच ग्रामपंचायत निंबळक प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना, मौजे गुरसाळे, ता. माळशिरस नळ पाणीपुरवठा योजना आणि मुख्याधिकारी, फलटण नगर परिषद फलटण आदींना पाठविण्यात आले आहे. र पत्र ग्रामपंचायत तरडगाव, सुरवडी, वाठार निंबाळकर, निंभोरे, साखरवाडी, वडजल, ढवळेवाडी, सोमंथळी, विडणी, फरांदवाडी, जाधववाडी, सांगवी, पिंप्रद, पवारवाडी, साठे, निंबळक / वाजेगाव तसेच ग्रामपंचायत निंबळक प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना, मौजे गुरसाळे, ता. माळशिरस नळ पाणीपुरवठा योजना आणि मुख्याधिकारी, फलटण नगर परिषद फलटण आदींना पाठविण्यात आले आहे.

सदर पत्राच्या प्रती कार्यकारी अभियंता ४९/९९० मधील) दुरुस्ती करावयाची असल्याने बंद झाले आहे,

तथापि आपल्या पाणीपुरवठ योजनेचा तलाव कालवा सुरू असताना नीरा उजवा कालव्याद्वारे पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० % भरून देण्यात आला असल्याचे या पत्राद्वारे निर्दर्शनास आणून देत आपल्या अधिनस्त असलेल्या तलावातील पिण्याचे पाणी दि. १५ जूनपर्यंत पुरेल असे नियोजन करावे. आपणास दि. १० जूनपूर्वी कोणत्याही परिस्थितीत पाणी देता येणार नसल्याचे या पत्रात नमूद असून याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पाण्यासाठीचे शेतकऱ्यांचे आंदोलन चिघळले

## रोहित पाटीलही आक्रमक, पोलीस ठाण्यात ठिय्या

**तासगाव :** पुणदी योजनेचे सिद्धेवाडी तलावात सोडलेले पाणी अचानक बंद केल्यामुळे संतप्त झालेल्या सावळजच्या(ता. तासगाव) शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाटा येथे राज्य मार्गावर दोन तास रस्ता रोको आंदोलन केले. या चक्काजामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. जोपर्यंत संबंधित योजनेचे अधिकारी रास्ता रोकोच्या ठिकाणी येत नाहीत, तोपर्यंत या ठिकाणावरून उठणार नाही, असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला. त्यामुळे आंदोलन चिघळले.



पोलिसांनी अजून आंदोलन करतात काही काळ बाचाबाची झाली. नंतर पोलिसांनी आंदोलन करताना पोलीस ठाण्यात नेल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. पुणदी योजनेचे पाणी सावळजला सोडण्यात आले होते. मात्र अवघ्या काही तासात हे पाणी बंद करण्यात आले. त्यामुळे सावळज भागातीलशेतकरीसंतप्त झाले आहेत. पाण्याच्या बाबतीत राजकारण केले जात आहे. अधिकारी नेत्यांच्या सांगण्यावरून पाणी बंद करत आहेत. पाण्याच्या बाबतीत केले जाणारे राजकारण खपवून घेणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. बंद केलेले पाणी तातडीने सुरू करावे, या मागणीसाठी सावळजच्या शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाट्याजवळ सुमारे दोन तास रास्ता रोको केला. पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघयांच्यासह पोलीस फाटा आंदोलनाचे ठिकाणी दाखल झाला होता त्यांनी आंदोलन करताना रास्ता रोको थांबवण्याची विनंती केली. मात्र अधिकारी येत नाहीत, तोपर्यंत रस्त्यावरून हलणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. त्यामुळे आंदोलन चिघळले पोलीस प्रशासनाने आंदोलन कर्त्यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

आंदोलनात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ताजुद्दीन तांबोळी, माजी जिल्हा परिषद सदस्य सागर पाटील, विवेक सावंत, विनायक पाटील, संदीप पाटील यांच्यासह पदाधिकारीशेतकरीमोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलन करताना पोलीस ठाण्यात नेल्याची माहिती मिळताच राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलीस उपाधीक्षक सचिन थोरबोले आणि पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांची भेट घेऊन बराच वेळ चर्चा केली. 'शेतकऱ्यावर गुन्हे दाखल करणार असाल तर माझ्यावर ही गुन्हा दाखल करा, शेतकऱ्यांना सोडेपर्यत मी पोलीस ठाण्यात ठाण मांडणार असल्याचा इशारा, यावेळी रोहित पाटील यांनी दिला. त्यामुळे पोलीस ठाण्यात देखील बराच वेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. सावळज बंद

पाण्यासाठी सावळजच्या शेतकऱ्यांनी रास्ता रोको केल्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळताच सावळजच्या ग्रामस्थांनी सावळज कडकडीत बंद ठेवून या घटनेचा निषेध व्यक्त केला.

पोलिसांकडून दहा जणांवर गुन्हा दाखलदरम्यान विनापरवाना रस्ता रोको आंदोलन केल्याप्रकरणी तासगाव पोलिसांनी दहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे त्यामध्ये राजाराम संभाजी चव्हाण (रा.सिद्धेवाडी), सागर पांडुरंग मोरे (रा.बिरणवाडी), विवेक वसंत सावंत, विनायक बाळासाहेब पाटील, बाळासाहेब तातोबा पाटील, सागर चंद्रकांत पाटील, ताजुद्दीन गुलाब तांबोळी, संजय जगन्नाथ थोरात, संदीप शिवाजी पाटील, यशवंत भीमराव पोळ (सर्व रा.सावळज), यांचा समावेश आहे.

## दहावीत मुलीच ठरल्या भारी; वर्धा जिल्हा विभाग तळाला

वर्धा:बारावीनंतर सोमवारी जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेत मुलांच्या तुलनेत मुलीच भारी ठरल्या. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निकाल दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर केला. जिल्ह्याचा एकूण निकाल ९२.०२ टक्के लागला आहे. आर्वी येथील विद्यानिकेतन इंग्लिश स्कूलची साक्षी मनोज गांधी ९९.८० टक्के गुण घेऊन जिल्ह्यातून पहिली आली आहे.

नागपूर विभागात जिल्हा दहावीच्या निकालात तळाला गेला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्चमध्ये दहावीची परीक्षा घेतली होती. जिल्ह्यातून १५,८६० विद्यार्थी प्रविष्ट होते. यात मुले ८ हजार ३०३, तर मुली ७ हाजार ५५७ ७ होत्या. प्रत्यक्षात ८ हजार १९६ मुले आणि ७ हजार ५१७ मुली अशा एकूण ११५ हजार ७१३ जणांनी परीक्षा दिली होती. यापैकी १४ हजार हजार ४६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात सात हजार १५१ मुली, तर सात हजार ३०९ मुलांचा समावेश आहे. मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्णतेचा टक्का जास्त आहे. ९५.१३ टक्के मुली, तर ८९.१७ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहे. गतवर्षी जिल्ह्याचा निकाल ८७.९८ टक्के लागला होता. त्या तुलनेत यंदा टक्केवारीत ४.०४ टक्के वाढ झाली आहे.

## दहावीच्या परीक्षेतही मुलींची बाजी, बीड जिल्हा छत्रपती संभाजीनगर विभागात पुन्हा अव्वल

**बीड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेतबीडजिल्हा छत्रपती संभाजीनगर विभागात अव्वल आला असून बारावीनंतर दहावीच्या परीक्षेतही निकालात मुलींनी बाजी मारली.

गतवर्षी बीड जिल्हा विभागात अव्वल होता. त्यामुळे यावेळी लागणाऱ्या निकालाची उत्सुकता होती.

बीड जिल्ह्यातू ४१५७१ मुला- मुलींनी परीक्षा दिली होती. निकालानुसार २३०११ मुले व १७४८३ मुली असे ४०४९४ एकूण विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.८२ तर मुलींचे प्रमाण ९८.१८ टक्के राहिले. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये पाटोदा तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९८.६० इतका लागला आहे.

त्या पाठोपाठ आष्टी ९८.८, शिरूर ९८.३८, बीड ९७.८७, वडवणी ९७.७६, केज ९७.४९, गेवराई ९७.२४, परळी ९६.९९, अंबाजोगाई ९६.५०, धारूर ९६.३३, माजलगाव तालुक्याचा निकाल ९६.२३ टक्के लागला.

# विधानसभेला राजे गटाची भूमिका काय असणार?

## फलटण तालुक्यात औत्सुकता

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत फलटणच्या राजे गटाने महायुती अर्थात भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शिवसेना यांच्यासोबत न जाण्याचा निर्णय घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार अकलूजच्या धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ सर्व यंत्रणा राबवली. राजे गटाने माढ्याचे विद्यमान खासदार व भाजपा महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा पराभव करण्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांना आपली संपूर्ण ताकद दिली. त्यामुळे राजे गटाची ही महायुतीतील बंडखोरीची भूमिका आगामी विधानसभा निवडणुकीतही कायम राहणार का? याकडे आता फलटण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर माढा लोकसभेसाठी महायुतीकडून फलटणच्या श्रीमंत रामराजे व राजे गटाने खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना तिकिट मिळू नये म्हणून



आटोकाट प्रयत्न केले. मात्र, अखेर महायुतीकडून अर्थात भाजपाकडून खासदार रणजितसिंह यांना माढ्याचे तिकिट मिळाले. त्यानंतर श्रीमंत रामराजे व राजे गटाने खासदार रणजितसिंह यांचे तिकिट रद्द करण्यासाठीही प्रयत्न केले. मात्र, ते प्रयत्नही फोल गेले. दरम्यान, अकलूजच्या मोहिते- पाटील घराण्यातील खासदारकीला इच्छुक असलेले धैर्यशील मोहिते-पाटील यांनीही खासदार रणजितसिंह यांचे तिकिट रद्द करून ते आपल्याला मिळावे, यासाठी बंडखोरी करण्याची भूमिका घेत रान उठविले. मात्र, त्यांचेही भारतीय जनता पार्टीने न ऐकल्यामुळे अखेर धैर्यशील मोहिते- पाटील यांनी बंडेखारी करत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडे हातमिळवणी केली. शरद पवार यांनी ही संधी साधून लागलीच धैर्यशील मोहिते-पाटील यांना आपल्या पक्षातून उमेदवारी जाहीर करून मोठा डाव साधला. धैर्यशील मोहिते-पाटील यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर फलटणच्या श्रीमंत रामराजे व संपूर्ण राजे गटाने आपले संपूर्ण

वास्तविक पाहता श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर हे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कार्यरत आहेत. लोकसभेला महायुतीच्या विरोधात घेतलेली भूमिका पाहता आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये श्रीमंत रामराजे व फलटणचा संपूर्ण राजे गट हा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वामध्ये कार्यरत असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसोबत जाणार, की ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वामध्ये पुन्हा सक्रियपणे काम करणार, याकडे आता तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, आज मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळावा होणार आहे.

या मेळाव्यास श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर आणि आ. दीपक चव्हाण यांची उपस्थिती दिसणार का? हेही पाहावे लागणार आहे. तसेच श्रीमंत रामराजे व राजे गटाने लोकसभेला महायुती धर्माचे पालन केले नाही, यावरही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून काय कारवाई होणार, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

## लॉप्ट कोसळून कामगाराचा मृत्यू

**सातारा :** सातारा रेल्वे स्थानकात बांधकाम सुरू असलेल्या पार्सल विभागाच्या इमारतीचा लॉप्ट कोसळून परप्रांतीय कामगाराचा जागीचमृत्यूझाला. ही घटना रविवारी दुपारी ३ च्या सुमारास घडली. अछ्छेलाल अमीरे कोल (वय २३, रा. सिध, मध्य प्रदेश) असे मृत कामगाराचे नाव आहे.

सातारा रेल्वे स्थानकात पार्सल कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या इमारतीच्या खिडक्या, दरवाजाचे कॉंक्रिटचे लॉप्ट तयार करण्यात आले. ९ इंची भिंतीच्या दरवाजावर ५ फूट लांब ३ फूट रुंद तसेच चार इंच जाडीचा अंदाजे २०० किलो वजन असलेला सिमेंटचा लॉप्ट बसविण्यात आला होता.

# कोयना धरणात पाणीसाठा कमी, तरी जुलैपर्यंत चिंता नाही

**कोयनानगर :** महाराष्ट्राची भाग्यरेषा असलेल्याकोयना धरणातीलपाणीसाठामे महिनाअखेर कमी झाला असला तरी किमान दि. १५ जुलैपर्यंतही चिंता नसल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्यातील बहुतांशी भागांतपाणीबाणीसुरू असताना राज्यातील तारणहार ठरलेल्या कोयना प्रकल्पाकडे पाणी मागणीचा भार वाढला होता. यादरम्यानकोयना धरणाच्यापायथा वीजगृह व नदी विमोचकातून कोयना नदीपात्रात गेले चार महिने अपवाद वगळता अखंडपणे पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे पूर्वेकडील कोयना, कृष्णा नदीवर अवलंबून असलेल्या भागाची तहान भागली व शेतीला उपयुक्त ठरले.

ऐन दुष्काळजन्य स्थितीत कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे वीजनिर्मितीसह कृष्णा, कोयना नदीकाठ जलसमृद्ध करत दुष्काळ भागांनाही दिलासा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कोयना प्रकल्पाकडून झाले आहे.



१०५.२५ टीएमसी पाणीसाठा असलेल्या कोयना धरणातील तब्बल ४४.२५ टीएमसी पाणी हे धरणातून पूर्वेकडे सिंचन व पिण्यासाठी सोडण्यात आले आहे. सध्या धरणात २१.९३ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असून जून महिन्यात जरी पावसाने दडी मारली तरी किमान १५ जुलैपर्यंत पुरेसा पाणीसाठा धरणात आहे.

कोयना धरणातील गत दोन वर्षे कोयना जलविद्युत प्रकल्पाने लवादाच्या मर्यादेपेक्षा अतिरिक्त पाण्याचा वापर वीजनिर्मिती करून राज्याला वीज संकटातून वाचवले होते. चालू वर्षी तांत्रिक वर्ष संपायला पाच दिवस बाकी असताना लवादाने निर्धारित केलेला ६७.५० टीएमसी पाणीसाठ्यापैकी ५४.७६ टीएमसी इतकाच पाण्याचा वापर वीजनिर्मितीसाठी झाला. त्यामुळे चालू तांत्रिक वर्षात वीजनिर्मितीसाठीचा आरक्षित पाणीसाठा संपण्याची शक्यता कमी आहे.-ऊ्नएठढखडएचएछढपायथा वीजगृहातून २१०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग..

-कोयना धरणात एकूण पाणीसाठा २१.९३ टीएमसी इतका असून मृतसाठा वगळता उपयुक्त पाणीसाठा १६.८१ टीएमसी आहे. कोयना धरणातून अतिरिक्त पाण्याचा विसर्ग करण्यात येणारे नदी विमोचक गेट चालू वर्षी दि. २० फेब्रुवारीला सुरू करण्यात आले होते. मार्च महिन्यातील दोन दिवस वगळता सलग सुमारे चार

# वादळी वाऱ्यामुळे सोलापुरात झाडे पडली, अनेक भागात साडेचार तास वीज पुरवठा ठप्प

**सोलापूर :** शहरात रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासहपाऊसझाला. अक्कलकोट रोड, होटगी रोड, जुळे सोलापूर, हत्तुरेवस्ती, शंकरनगर, नई जिंदगी भागात झाडे उन्मळून रस्त्यावर, विजेच्या तारांवर कोसळली. या भागातील वीजपुरवठा सायंकाळी साडेपाच ते नऊ वाजेपर्यंत बंद होता.

महापालिकेचे आपतकालीन पथक, वीज वितरणच्या कर्मचाऱ्यांना तारांवर कोसळलेली झाडे हटविण्यासाठी परिश्रम घ्यावे लागले.-



ऊ्नएठढखडएचएछढसायंकाळी पाचच्या सुमाराला ढग दाटून आले. वारे वाहू लागले. यादरम्यान महापालिकेच्या आपतकालीन कक्षात विविध भागांत नुकसान झाल्याच्या तक्रारी येऊ लागल्या. नगर अभियंता सारिका आकुलवार, उपअभियंता युसूफ मुजावर यांनी नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांना या भागात जाऊन रस्त्यावर पडलेली झाडे, साहित्य हटविण्याच्या सूचना केल्या.

अक्कलकोट रोड भागातील राजूनगरमध्ये झाड कोसळले. या भागातील रहिवाशी, मनपाच्या आपतकालीन पथकाने सायंकाळी सहा वाजता झाड बाजूला काढले. वीजपुरवठा सुरू व्हायला बराच वेळ लागला. जुळे सोलापुरातील बॉम्बे पार्क, गंगाधरनगर भागात वाऱ्यामुळे झाडे कोसळली. विमानतळाच्या समोर हत्तुरेवस्ती भागातील झाडे रस्त्यावर कोसळली. विजेच्या तारा तुटल्या, खांबशंकरनगर भागातील बिरोबा मंदिराजवळचे ५० वर्षांपूर्वीचे झाडही तारांवर कोसळले. मजरेवाडी ते सिद्धेश्वर कारखाना परिसरातील वीजपुरवठा साडेचार तास बंद होता, असे माजी नगरसेवक सुभाष शेजवाल आणि वैभव हत्तुरे यांनी सांगितले.

महापौर बंगलाच्या मागील झाडही विजेच्या तारांवर कोसळले. हे झाड हटविण्यासाठी पथकाला बरेच परिश्रम घ्यावे लागले.

# यंदाही निकालात मुलीच पुढे जिल्ह्याचा निकाल ९६.४५ टक्के

**अकोला :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल सोमवारी २७ मे रोजी रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर केला. अकोला जिल्ह्याचा दहावीचा निकाल गतवर्षीच्या तुलनेत ३ टक्क्यांनी वाढल्याचे दिसून येत आहे. यंदाचा एकूण निकाल ९६.४५ टक्के लागला असून, यंदाही दहावी परीक्षेत अपेक्षेप्रमाणे मुलींनीच आघाडी मिळवली आहे. गतवर्षी मुलांची टक्केवारी ९०.५५ होती. यंदा मात्र, त्यात पाच टक्क्यांनी घसघशीत वाढ झाली आहे.



दहावी परीक्षेला जिल्ह्यातून एकूण २५ हजार ३२५ विद्यार्थ्यांपैकी २५ हजार १०९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यंदा १२१ परीक्षा केंद्र देण्यात आले होते. यंदाही जिल्ह्याचा नेत्रदीपक असा निकाल लागला आहे. गतवर्षीपेक्षा यंदा मुलांचा निकाल ९५.१७ टक्के, तर मुलींचा निकाल ९७.८४ टक्के लागला आहे. २५ हजार १०९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल २४ हजार २१९ विद्यार्थी दहावी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. १३ हजार ६६ मुलांपैकी १२ हजार ४३६ मुले उत्तीर्ण झाली, तर १२ हजार ४३ मुलींपैकी ११ हजार ७८३ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.